स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत मराठी विषयाचा पीएच.डी. (विद्यावाचस्पती)
पदवीसाठी नोंदणी करण्यासाठीचा प्रारूप आराखडा

संशोधन विषय

“दलित व आदिवासीच्या निवडक आत्मकथनाचा: एक तुलनात्मक अभ्यास”

संशोधक

शेकुराव विठ्ठलराव खोकले

एम.ए.(मराठी), डी.एड.,बी.एड. नेट

रा. सेलु पो. आंबा ता. वसमत जि. हिंगोली पिन - 431512

भ्रमणध्वनी - 9767234811 / 9765525805

Email ID : skhokale1580@gmail.com

मार्गदर्शक

प्रा.डॉ. संतोष चंपती हंकारे

मराठी विभागप्रमुख,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगांव
ता. गंगाखेड जि. परभणी
मो.नं. 7972831323

संशोधन केंद्र

भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपुरी, नांदेड - 431606.

सप्टेबर - 2022

दलित व आदिवासींच्या निवडक आत्मकथनांचा : एक तुलनात्मक अभ्यास

प्रास्ताविक:-

भारतीय समाजाची रचना विभिन्न स्वरूपाची असून अनेक धर्म संप्रदाय आणि जातीनुसार भारतीय समाजामध्ये विविध जातीचे अनेक लहान मोठे समूह वास्तव्य करतात. या प्रत्येक समूहाने आपले जीवन जगत असतांना आचार, विचार, तत्त्वज्ञान, आपली स्वतंत्र एक संस्कृती जपली आहे. आपल्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी वाटेल ती कामे केली आहेत. प्रसंगी अन्न मिळत नसल्यामुळे शिकार करून, प्राण्यांचे मांस खाऊन जीवन जगले आहे. काळानुरूप शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक उन्नती साधण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षण घेतल्यानंतर आत्मभान जागे झाल्यानंतर आपले विचार, मते ती व्यक्त करू लागली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मराठी साहित्यामध्ये १९६० नंतर कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्र व आत्मकथन इत्यादी माध्यमातून ती व्यक्त होऊ लागली. मराठी साहित्यामध्ये लोकप्रिय प्रकार म्हणून प्राचीन काळापासून हे वाङ्मय प्रकार विकसित झालेले दिसतात.

यावरून असे दिसून येते की १९६०नंतर भारतीय मराठी साहित्यामध्ये वेगवेगळे साहित्य प्रवाह निर्माण झालेले दिसतात. त्यातील आत्मचरित्र हा एक लोकप्रिय असा वाङ्मय प्रकार आहे. आपणास जी व्यक्ती प्रिय व आदर्श वाटते. अशा व्यक्तीची स्मृति

भविष्यासाठी जागृत राहावी व त्यांच्यामुळे इतरांनाही प्रेरणा, स्फूर्ती मिळावी या उद्देशाने आत्मचरित्र हा प्रकार उदयास आला.

सुरुवातीच्या काळात राजकीय , सामाजिक तसेच धार्मिक क्षेत्रात जे थोर पुरुष होऊन गेले त्यांनी आत्मचरित्रे लिहिलेली दिसतात.

जवळपास सर्व क्षेत्रातील आदरणीय अशा व्यक्तीचे आत्मचरित्र आली आहेत. स्वतःच स्वतःविषयी जीवनाचा घेतलेला आढावा म्हणजे आत्मचरित्र होय त्यांचा प्रारंभ ब्रिटिश पूर्वकाळात संत कवींनी प्रसंगाविषयी आपल्या अभंगातून केला मात्र पेशवेकाळात आत्मचरित्र लिहिण्याचा पुरावा दिसत नाही.

इंग्रजी राजवटीत शिक्षणाचा प्रसार झाल्याने शिक्षितांची संख्या वाढू लागली. प्रथम उच्चवर्णीय साहित्यिकांनी साहित्याची निर्मिती केली नंतर.१९६० नंतरच्या काळात मराठी वाङ्मय अनेक प्रवाह निर्माण झाले. समाजाच्या विविध स्तरातून विविध जाती जमाती मधून शिकलेली मंडळी साहित्याचे वाचन, लेखन करू लागली. त्यामध्ये विविध क्षेत्रातील व्यक्तीने आपल्या जीवनाचा आढावा घेत आत्मचरित्र लेखन केले. त्यात विविध प्रवाह मिळाले. विशेष स्त्रीयांनी लिहिलेले आत्मचरित्र व दलित आदिवासीची काही आत्मकथने हा महत्त्वाचा भाग आहे. चरित्र- आत्मचरित्र नंतर आत्मकथन हा लेखनाचा स्वतंत्र प्रकार निर्माण झालेला दिसतो. आत्मकथन हा अगदी

अलीकडे निर्माण झालेला साहित्य प्रकार असून या साहित्य प्रकाराने स्वतःचे असे स्थान अबाधितपणे टिकून ठेवले आहे.

दलित साहित्याने आत्मचरित्रे ही संकल्पना नाकारून आत्मकथन हा शब्दप्रयोग स्विकारला आणि आत्मकथन ही संज्ञा आता मराठी साहित्यात रूढ झाली आहे. दलित व आदिवासी समाजाच्या साहित्याकांनी वास्तव जीवनदर्शन घडविणारी दर्जेदार अशी काही आत्मकथने लिहिली आहेत. दलित व आदिवासी हे दोन्ही समाज तसे गावकुसाबाहेर राहाणारे समाज आहेत. दोन्ही समाजाच्या वाट्याला दारिद्र्य, दुःख आणि वेदना सोसत एकूणच भयाण अशा स्वरूपाचे जगणे त्यांच्या वाट्याला आले आहे.दलित व आदिवासींच्या जीवनाच्या व्यथा वेदनांना आत्मकथनाच्या माध्यमातून अनेक लेखकांनी वाट मोकळी करून दिली आहे. तसे मराठी साहित्यात दलित व आदिवासी साहित्य प्रवाहाच्या माध्यमातून दोन्ही साहित्य प्रवाहाच्या लेखकांनी वेगवेगळ्या साहित्य प्रकारात विपूल लेखन केले आहे. समाजातील वास्तव, वेदनादायी जीवनानुभवाबरोबरच दुःख आणि वेदना , त्यांच्यावर झालेले अन्याय ,आत्याचार याचेही त्यांच्या साहित्यातून चित्रण आलेले आहे. त्यांचे हे चित्रण प्रामुख्याने आत्मकथनाच्या माध्यमातून आलेले दिसते. म्हणून दलित व आदिवासींच्या निवडक आत्मकथनाचा तुलनात्मक अभ्यास हा विषय निवडून त्यावर संशोधन करणे महत्त्वाचे ठरते. म्हणून प्रस्तुत विषय मी संशोधनासाठी मी घेतलेला आहे.

प्रस्तुत विषयावर तुलनात्मक स्वरूपात संशोधन अद्यापपर्यंत झालेले दिसत नाही.तेंव्हा याविषयावर संशोधन होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

म्हणून प्रस्तुत विषय मी अभ्यासासाठी निवडला आहे.

या संशोधनाच्या माध्यमातून खालील निवडक आत्मकथनाचा तुलनात्मक अभ्यास करायचा आहे.

दलित लेखक

अ.क्र.	आत्मकथन	लेखक
1.	जग बदल घालुनी घाव	एकनाथ आव्हाड
2.	एका कार्यकर्त्याचा आत्मजागर	दादाजी बागुल
3.	झुंज	रामराव झुंजारे
4.	टाच	प्रल्हाद चेदवनकर
5.	काट्यावरची पोट	उत्तम बंडू तुपे
6.	बाप्तिस्मा ते धर्मांतर	इसादास भडके

आदिवासी लेखक

1.	आकांत	बाबाराव मडावी
2.	ठिगळ	किसन डगळे
3.	उघडा दरवाजा	रामराजे आत्राम
4.	मी एक स्वप्न पाहिलं	डॉ.राजेंद्र भारुड
5.	आंधाच कारट	डॉ.राजेश धंनजकर
6.	भूमकाल	माधव सरकुंडे

विषयाचे महत्त्व-

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजात जे जे घडते ते साहित्यात प्रतिबिंबित होते. दलित व आदिवासी आत्मकथन लेखन करणाऱ्या दोन समाजातील दुःखाविषय राजकीय, सामाजिक, दलित व आदिवासी वास्तवावर प्रखडपणे भाष्य केलेले पाहायला मिळते. त्याच बरोबर मानवी जीवनातील गुंतागुंत आणि जागतिकीकरणाच्या रेट्यातून निर्माण झालेले माणसाचे मुल्यहीन जगणे उभयतांच्या आत्मकथनातून प्रतिबिंबित होते. या दोन्ही समाजातील आत्मकथनकाराच्या आत्मकथनामध्ये आशय अभिव्यक्तीच्या पातळीवर समानता येते. ते महत्त्वाचे वाटते.

दलित व आदिवासी यांच्या आत्मकथनातून मराठी भाषेतील विविध प्रकारची शब्दकळा वापरण्यात आलेली दिसून येते. ही शब्दकळा त्यांची स्वतःची अशी एक स्वतंत्र ओळख निर्माण करून देते. म्हणून त्यांच्या भाषेचे महत्त्व, वेगळपण आणि त्यांच्या भाषेची वैशिष्ट्ये काय आहेत याचाही अभ्यास या आत्मकथनाचा माध्यमातून करण्यात येणार आहे. त्यांनी वापरलेल्या शब्दांचा भावार्थ शोधून त्यांचा अन्वयार्थ लावणे आणि त्यांचे भाषिक विश्लेषण करणे महत्त्वाचे आहे. संवेदनशीलतेतून माणसाच्या जगण्यातील सूक्ष्म बद्दल पोखरलेल्या समाजव्यवस्थेला व जगण्याच्या दु:खद जाणिवांचा जीवनपट या आत्मकथनाचा माध्यमातून आला आहे. त्याचे तुलनात्मक विश्लेषण प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे -

1. मराठी आत्मकथन या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास करणे.
2. दलित व आदिवासीच्या आत्मकथनातून जीवनानुभवाचा शोध घेणे.
3. दलित व आदिवासीच्या आत्मकथनातून व्यक्तिचित्रनाचा अभ्यास करणे.
4. दलित व आदिवासीच्या आत्मकथनातील भाषाशैली अभ्यासणे.
5. दलित व आदिवासीच्या आत्मकथनातील तुलनात्मक मीमासा करणे.
6. परिणामाचा अभ्यास करणे.

गृहितके -

1. दलित व आदिवासीच्या आत्मकथनांनी मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे.

2. लेखक ज्या परिसरात वाढलेला असतो तेथील परिसर, निसर्ग व समाजाचे वर्णन त्यात केलेले असते.

3. मराठीतील आत्मकथनात दलित व आदिवासीची भाषाशैलीतील वेगळेपण दिसून येते.

4. दलित व आदिवासींची आत्मकथने ही वास्तव जीवनाशी जवळीक साधणारी आहेत.

विषयाची व्याप्ती व मर्यादा-

1. व्याप्ती-

प्रस्तुत संशोधन हे दलित व आदिवासी लेखक आणि जी आत्मकथने लिहिली आहेत. त्यावर अवलंबून असून त्यातील निवडक दलित आत्मकथने सहा व आदिवासी निवडक आत्मकथने सहा अशा एकूण बारा आत्मकथनाचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे. अशी या संशोधनाची व्याप्ती आहे.

2. मर्यादा-

दलित व आदिवासीच्या निवडक आत्मकथनाचा तुलनात्मक अभ्यास हा संशोधनाचा विषय आहे . दलित निवडक आत्मकथने सहा व आदिवासी निवडक आत्मकथने सहा एकूण बारा दलित व आदिवासी निवडक आत्मकथनाचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे ही या संशोधनाची मर्यादा आहे.

संशोधन पद्धती-

प्रस्तुत संशोधनात विषयाचे संशोधन करताना गरजेनुसार व आवश्यकतेनुसार संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.तुलनात्मक संशोधन पद्धती, वर्णनात्मक संशोधन पद्धती, विश्लेषणात्मक संशोधन पद्धती , स्पष्टीकरणात्मक संशोधन पद्धती. इत्यादी इत्यादी संशोधन अभ्यास पद्धतीचा अवलंब केला जाईल.

प्रस्तुत विषयाचे शोधप्रबंध लेखन पुढील प्रकरणाच्या आधारे करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले

तुलनात्मक साहित्य: संकल्पना आणि स्वरूप

प्रस्तुत प्रकरणांमध्ये तुलनात्मक साहित्य म्हणजे काय? तुलनात्मक साहित्य अभ्यासाला केव्हा व कोठे सुरुवात झाली? या साहित्याचे वेगळेपण तुलनात्मक साहित्याचे वाङ्मय क्षेत्रातील महत्त्व याचा सखोल अभ्यास करण्यात येईल. तसेच अभ्यासपद्धतीच्या सहाय्याने आजच्या काळात तुलनात्मक साहित्य पद्धतीचे महत्त्व यांचा आढावा या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे

मराठी आत्मकथन, संकल्पना आणि स्वरूप

प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून मराठीतील आत्मकथनातील संकल्पना व स्वरूप लेखनाची सुरुवात केव्हा झाली ? आत्मकथने का लिहावी लागली ? मराठीतील आत्मकथनांचे स्वरूप स्पष्ट करून त्याचा थोडक्यात आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे

दलित व आदिवासीची आत्मकथने : प्रेरणा आणि स्वरूप

प्रस्तुत प्रकरणात दलित व आदिवासीच्या आत्मकथना मागच्या प्रेरणा कोणत्या आहेत यांचा शोध घेण्यात येणार आहे. लेखक आपले अनुभव आत्मकथनातून वास्तव जीवनाचे चित्रण अनुभवाच्या पातळीवर मांडत असताना सुखद- दुःखद अनुभव आत्मकथनाचा माध्यमातून मांडत असतो . सदरील प्रकरणात प्रस्तुत प्रबंधासाठी निवडलेल्या दलित व आदिवासीच्या निवडक आत्मकथनाचा अभ्यास करायचा आहे.

प्रकरण चौथे

दलित व आदिवासी आत्मकथनातील सामाजिक व सांस्कृतिक जाणिवा

प्रस्तुत प्रकरणात दलित व आदिवासी लेखक जीवन जगत असताना वास्तव पातळीवर जे अनुभव आले तेथे त्यांनी आपल्या आत्मकथनाच्या माध्यमातून व्यक्त केले आहेत. त्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील शोध घेऊन त्याची विश्लेषणात्मक मांडणी सदर प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

दलित व आदिवासींच्या आत्मकथनातील साम्ये-भेदाचे स्वरूप

प्रस्तुत प्रकरणात दलित आत्मकथनातील भेद व आदिवासी आत्मकथनातील भेद कोणत्या प्रकारचे आहेत. दलित लेखकांना जीवन जगताना त्यांच्या वाट्याला आलेले दुःख त्याचबरोबर आदिवासी लेखकांना त्यांचे जीवन जगताना आलेले दुःखद अनुभव जंगल , द-या- खोऱ्यात आदिवासी बांधवांचे वास्तव चित्रण यांचा सखोल अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करावयचा आहे.

प्रकरण सहावे

दलित व आदिवासीच्या आत्मकथनातील भाषिक वैशिष्ट्ये

प्रस्तुत प्रकरणात दलित व आदिवासीच्या आत्मकथनाची भाषाशैली , भाषिक वैशिष्ट्ये भाषेत उमटलेले बोलीभाषेचे पडसाद त्यांचे भाषिक वेगळेपण यांचा संदर्भीय आढावा घेण्यात येणार आहे. तसेच आत्मकथनाच्या भाषेतील म्हणी, वाक्यप्रचार, संकेत बोलण्याची पद्धत यांची विश्लेषणात्मक व वर्णनात्मक मांडणी प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे

उपसंहार

प्रस्तुत प्रकरणात दलित व आदिवासीच्या निवडक आत्मकथनाचा एक तुलनात्मक अभ्यास संशोधनाच्या माध्यमातून निघणारी निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत. शेवटी परिशिष्टे, आधारभूत ग्रंथ आणि संदर्भ ग्रंथ सूची जोडण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ सूची -

1) जग बदल घालुनी घाव - एकनाथ आव्हाड

2) एका कार्यकर्त्याचा आत्मजागर - दादाजी बागुल

3) झुज - रामराव झुंजारे

4) टाच - प्रल्हाद चेदवणकर

5) काटयावरची पोट - उत्तम बंडू तुपे

6) बाप्तिस्मा ते धर्मांतर - इसादास भडके

7) आकात - बाबाराव मडावी

8) ठिगळ - किसन डगळे

9) उघडा दरवाजा - रामराजे आत्राम

10) मी एक स्वप्न पाहिल ! - डॉ. राजेंद्र भारूड

11) आंधाच कारट - डॉ. राजेश धनजकर

12) भुमकाल - माधव सरकुंडे

13) दलित साहित्य : वेदना विद्रोह - डॉ. भालचंद्र फडके

14) दलित आत्मकथने - डॉ. वासुदेव मुलाटे

15) दलित वाङ्मय: प्रेरणा आणि प्रवृत्ती - डॉ. शंकरराव खरात

16) दलित साहित्य एक अभ्यास - संपादक अर्जून डांगळे

17) दलित साहित्याचे निराळेपण - डॉ. प्रभाकर मांडे

18) आदिवासी साहित्य - दिशा आणि दर्शन - डॉ. विनायक तुमराम

19) आदिवासी साहित्य विविधांगी आयात - डॉ. माहेश्वरी गावित

20) मागोवा इतिहासाचा - डॉ. संगिता मेश्राम

21) आदिवासी साहित्य संम्मेलने अध्यक्षीय भाषणे - गोविंद गारे

संशोधक

शेकुराव विठ्ठलराव खोकले
रा. सेलु पो. आंबा
ता. वसमत जि. हिंगोली
पिन - 431512

मार्गदर्शक

प्रा. डॉ. संतोष चंपती हंकारे
मराठी विभाग प्रमुख,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,
राणीसावरगांव ता. गंगाखेड जि. परभणी